**<u>मोटार अपघात अर्ज क्र. १/२०१८</u>**
**निशाण क्र. ७६**

अर्जदारतर्फे **साक्षीदार क्र. ४** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— ओंकार   वडिलांचे नांव :— दिपक हिर्लेकर,
वय सुमारेः— २५ वर्षे,  व्यवसाय :— नोकरी,
निवासस्थान :— कसाल, ता.:— कुडाळ,  जि. :— सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. डी.अे.अंधारी यांचा.</u>**

१.  मी सापळे ऑटो सर्व्हिसेस, कणकवली येथील अपघात विभागामध्ये पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहे.  आमचे सदरील प्रतिष्ठानात टोईंग व्हॅन आहे. अर्जदार सर्वेश गांवकर यांचे गाडीचा अपघात झाला होता आणि दि. ०१/०८/२०१७ रोजी त्यांची गाडी आमचे प्रतिष्ठानामार्फत हळवल, ता. कणकवली येथून म्हापसा—गोवा येथे टोईंग करुन घेवून गेलो होतो आणि ती पुन्हा कणकवली येथे आणली होती.  टोईंग व्हॅनचे भाडे अर्जदार यांनी आम्हांला दिले होते आणि त्याबाबतची रुपये ६,५००/— ची पावती मी त्यांना दिली होती.  आता मला सदरील पावती दाखविली.  त्यावर जयेश सापळे यांचेकरीता मी सही केलेली आहे.  जयेश सापळे हे सदरील प्रतिष्ठानाचे मालक आहेत. सदरील पावतीमधील मजकूर सत्य व खरा आहे.  तिला **<u>नि. ७७</u>** दिली.

२.  पुन्हा सदरील अर्जदार यांची गाडी आमचे प्रतिष्ठानामार्फत दि. ०९/०८/२०१७ रोजी हळवल, ता. कणकवली येथून म्हापसा—गोवा येथे टोईंग करुन घेवून गेलो होतो. त्याबाबतचे भाडे अर्जदार यांनी आम्हांला दिले होते आणि त्याबाबतची रुपये ५,०००/— ची पावती मी त्यांना दिली होती.  आता मला सदरील पावती दाखविली.  सदरील पावतीमधील मजकूर सत्य व खरा आहे.  तिला **<u>नि. ७८</u>** दिली.

३.  आता मला सापळे ऑटो सर्व्हिसेस, कणकवली यांनी दिलेली

पावती दाखविली. त्यावर आमचे प्रतिष्ठानची कॅशिअर, रुपाली गावडे यांची सही आहे. त्यांची सही मी ओळखतो. तिला (हरकतीसह) **नि. ७९** दिली.

**उलटतपास सामनेवाले क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ श्रीमती एस. आर. मसुरकर यांचा.**

४. हे म्हणणे खरे नाही की, मला सापळे ऑटो सर्व्हिसेस, कणकवली यांनी साक्ष देण्यासाठी अधिकार पत्र दिलेले नाही. आता मला अधिकार पत्र दाखविले. त्याला **नि. ८०** दिली. हे म्हणणे खरे नाही की, सदरील अधिकार पत्रामध्ये सापळे ऑटो सर्व्हिसेसतर्फे मी साक्ष द्यावी, असे नमूद नाही. आमचे प्रतिष्ठानामार्फत ज्या वाहनाने अर्जदार यांचे वाहन टोईंग करुन घेवून गेलो, त्या वाहनाचे मालकीचे कागदपत्र मी दाखल केले नाहीत. सदरील वाहन आमचे प्रतिष्ठानाचे कोणते कर्मचारी किंवा चालक चालवित होते, त्याबद्दलचा लेखी पुरावा मी सादर केलेला नाही. दि. ०१/०८/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजताचे सुमारास आम्ही अर्जदार यांची गाडी टोईंग करुन हळवल, ता. कणकवली येथून म्हापसा—गोवा येथे घेवून गेलो आणि दुपारी १.०० वाजता म्हापसा—गोवा येथे पोहोचलो. पावती (नि. ७७) मध्ये गाडी फक्त हळवल, ता. कणकवली येथून म्हापसा—गोवा पर्यंत घेवून गेल्याचे नमूद आहे. सदरील पावतीमध्ये किती कि. मी. हे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांना मी पावती (नि. ७७) खोटी दिली. सदरील पावतीमध्ये कि. मी. नमूद करण्यास मला अडचण नव्हती.

५. दि. ०१/०८/२०१७ रोजी सकाळी १०.३० वाजताचे सुमारास आम्ही अर्जदार यांची गाडी हळवल, ता. कणकवली येथील अर्जदार यांचे घराकडून म्हापसा—गोवा येथे घेवून गेलो आणि तेथे आम्ही दुपारी १२.०० वाजता पोहोचलो. पावती (नि. ७८) मध्ये किती कि. मी. हे नमूद नाही. सदरील पावतीमध्ये कि. मी. नमूद करण्यास मला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांना मी पावती (नि. ७८) खोटी दिली. आमचे

प्रतिष्ठानची कॅशिअर, रुपाली गावडे ही साक्ष द्यायला न्यायालयामध्ये येवू शकते. हे म्हणणे खरे नाही की, सदरील पावती (नि. ७९) खोटी आहे.

६. मी अर्जदार यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांना नुकसानभरपाईची रक्कम मिळावी म्हणून मी साक्ष खोटी दिली.

फेरतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृती,

दिनांक :—३१/०८/२०१९

अध्यक्ष,
मोटार अपघात वाद न्यायाधीकरण,
सिंधुदुर्ग—ओरोस.